# // प्रेस नोट //

दिनांक २८/११/२०१८

**लोकसेवक १)श्रीमती स्वाती सुर्यभान घुगे, वय ३२ वर्षे,धंदा नोकरी,तलाठी सजा परभणी केसापुरी, वर्ग-३, रा.ह.मु. शिवाजी धांडे नगर, बार्शी रोड, बीड, २) श्री महादेव छत्रभुज मोरे, वय ५२ वर्षे, खाजगी ईसम रा.गुंदा वडगाव, ता.जि. बीड यांना १,०००/- रुपयाची लाच घेतांना रंगेहात पकडले.**

---

दि.२८/११/२०१८ रोजी तक्रारदार यांनी अेसीबी कार्यालयात हजर येवून तक्रार दिली की, तक्रारदार यांचे नावावरील शेतजमीन त्यांचे पत्नीच्या नावे करुन नवीर फेरफार करण्यासाठी लोकसेविका श्रीमती स्वाती सुर्यभान घुगे, तलाठी सजा,परभणी केसापुरी ता.जि. बीड हे तक्रारदार यांना १,०००/- रुपये लाचेची मागणी करीत आहेत. वगैरे मजकुराची तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन परभणी केसापुरी येथे पंचासमक्ष लाच मागणी बाबत खात्री केली असता लोकसेविका श्रीमती स्वाती सुर्यभान घुगे, तलाठी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामासाठी १,०००/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरुन आज दिनांक २८/११/२०१८ रोजी लोकसेविका श्रीमती स्वाती सुर्यभान घुगे, तलाठी सजा परभणी केसापुरी यांचे विरुध्द परभणी केसापुरी येथील तलाठी सजा कार्यालय परिसरात लाचेचा सापळा आयोजित केला असता तलाठी श्रीमती घुगे यांचे सांगण्यावरुन त्यांचे मतदनीस महादेव मोरे, यांनी कार्यालयात तक्रारदार यांचेकडून १,०००/- रुपयाची लाच रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले असून **लोकसेविका १) स्वाती सुर्यभान घुगे,वय ३२ वर्षे,धंदा नोकरी,तलाठी सजा परभणी केसापुरी,वर्ग-३, रा.ह.मु. शिवाजी धांडे नगर, बार्शी रोड, बीड २) श्री महादेव छत्रभुज मोरे, वय ५२ वर्षे, खाजगी ईसम रा.गुंदा वडगाव, ता.जि.बीड** यांचेविरुध्द पोस्टे पिंपळनेर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा-१९८८ (सुधारणा- २०१८) प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कारवाई मा.श्री.श्रीकांत परोपकारी, पोलीस अधीक्षक अेसीबी औंरगाबाद, मा.श्री.एस.आर.जिरगे, अपर पोलीस अधीक्षक, अेसीबी औरंगाबाद यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री.बाळकृष्ण हनपुडे पाटील, पोलीस निरीक्षक गजानन वाघ व टीम एसीबी बीड यांनी केली आहे.

याद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांचे सरकारी कामासाठी लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी खालीलप्रमाणे संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| **टोल फ्री क्रमांक** | :- | **१०६४** |
| **दुरध्वनी क्रमांक** | :- | **०२४४२/२२२६४९** |
| **मेल आयडी** | :- | dyspacbbeed@gmail.com |
| **वेबसाईट** | :- | www.acbmaharashtra.gov.in |
| **मोबाईल ॲप** | :- | www.acbmaharashtra.net |
| **फेसबुक पेज** | :- | www.facebook.com/MaharashtraACB |

२८/११/१८

**(बाळकृष्ण हनपुडे पाटील)**
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.